ISSN 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 4 | October - 2016

GRT

Golden Research Thoughts

संशोधन अहवालाचा संशोधनातील वापर– एक अध्ययन

प्रा. सुदाम कडूजी कोरडे[1] , डॉ. जयवंत एस. भोयर[2]

[1]सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय नवापूर जि. नंदुरबार .

[2]प्राचार्य व संशोधन मार्गदर्शक , कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविदयालय हिंगोली.

प्रस्तावना :–

सामाजिक संशोधनात शास्त्रीय पध्दती आणि तंत्राचा उपयोग करून तथ्यांचे संकलन केले जाते आणि या संकलित तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन केले जाते. तसेच तथ्यांना सुव्यवस्थित रितीने प्रस्तुत करावे लागते. त्यासाठी वर्गीकरण सारणीयन, आकृती, आलेख इत्यादींचा उपयोग करावा लागतो. पण केवळ वर्गीकरण सारणीयन एवढयावरच संशोधन पूर्ण होत नाही, तर जमा केलेल्या तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करून शेवटी निष्कर्ष काढावा लागतो आणि हा निष्कर्ष जनहितासाठी प्रसिध्द करावा लागतो तसेच संशोधन कार्याचे संपूर्ण विवरण एका क्रमबध्द रितीने लिखित स्वरूपात प्रस्तुत करावे लागते. ह्यालाच 'संशोधन अहवाल' म्हणतात.

संशोधन अहवालात संशोधनाचा उद्देश, अध्ययन क्षेत्र, संशोधन पद्धत, तंत्रे, संकलित तथ्यांचे विवरण, विश्लेषण, व्याख्या, निष्कर्ष आणि काही महत्त्वाच्या सूचना या सर्व बाबींचा समावेश असतो. संशोधनाचा अहवाल तयार केल्यामुळे संशोधकाने कोणत्या विषयाबाबत कशाप्रकारे संशोधन केले, कोणते निष्कर्ष मांडले, या संबंधीची माहिती प्राप्त होते. त्या विषयाच्या संबंधात दुसरा कोणता संशोधक संशोधन करून त्या निष्कर्षाची पुर्नपरीक्षा करू शकतो. तसेच संशोधकाने आपल्या संशोधनातून मांडलेल्या महत्त्वपूर्ण सूचना व उपाय लक्षात घेऊन विविध सामाजिक योजना तयार करणे शक्य होते. संशोधन हे एक व्यक्ती किंवा काही व्यक्ती करीत असले तरी त्यांनी केलेले संशोधन लोकांपुढे येणे आवश्यक असते.

अध्ययनाची प्रक्रिया अधिक महत्त्वाची आहे, तर अध्ययन म्हणजे काय ज्ञान, माहिती व कौशल्य प्राप्त करणे आणि त्याद्वारे स्वत:च्या वर्तनात कायमस्वरुपी जो बदल घडून येतो त्याला अध्ययन म्हणतात. आपण संशोधन करण्यापूर्वी ज्ञान म्हणजे काय, माहिती म्हणजे काय ? या संदर्भात माहिती घेणे महत्त्वाचे आहे. ज्ञान व माहिती यात नेमका काय फरक आहे याची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. knowledge means acquaintance with principal, acquaintance with fact, acquaintance with truth.

म्हणजेच एखादी वास्तविकता, तत्त्व आणि सत्याची जाणीव होणे म्हणजे ज्ञान होय. तर माहिती म्हणजे तथ्ये **(Data)** होय म्हणून माहिती व ज्ञान यामध्ये फरक दिसून येतो.

संशोधनाची उद्दिष्टये (Objectives)

१. संशोधन अहवालाचा अभ्यास करणे.
२. संशोधन अहवालाचे संशोधनातील महत्त्व जाणून घेणे
३. संशोधन अहवालाच्या सामाजिक उपयुक्तेचा अभ्यास करणे.

संशोधन अहवालाचा उद्देश (Objects of Research Report)

हे संशोधनाचा अहवाल तयार करणे हा संशोधन प्रक्रियेतील अंतिम टप्पा आहे. संशोधन अहवालाचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१. ज्ञानात लिखित भर टाकणे

अहवालाद्वारे नवे ज्ञान उपलब्ध होते. जुन्या ज्ञानात नवी ज्ञानाची भर पडते. संशोधनाकरीता संशोधन कर्ता आपले श्रम, वेळ आणि पैसा खर्च करतो. संशोधन कर्त्याने आपले संशोधन केवळ आपल्यापुरतेच मर्यादित ठेवले, ते संशोधन अहवालाच्या स्वरूपात प्रस्तुत केले नाही. तर त्या संशोधनाचे कोणतेच महत्त्व राहणार नाही. म्हणून संशोधनास एका क्रमबध्द लिखित स्वरूपात प्रस्तुत करणे आवश्यक असते.

२.वास्तविक स्थिती स्पष्ट करणे

अहवालात संशोधन विषयासंबंधी परिपूर्ण माहिती असते. त्यामुळे संशोधन विषयाशी संबंधित त्या विषयाची सर्व आंगोपांगाची माहिती किंवा स्थिती कळून येते. संशोधन अहवालाचा आणखी एक महत्त्वाचा उद्देश आहे संशोधन संबंधीची माहिती स्वत:ला कळल्यानंतर ती दुसऱ्याला देखील कळली पाहिजे. ही खरी संशोधनाची सार्थकता होय.

३. सार्वजनिक उपयोगाकरिता

शासकीय योजना तयार करणे, सामाजिक धोरणे ठरविणे याकरिता देखील संशोधनाचा उपयोग होतो. समाजात विविध सामाजिक समस्या असतात. संशोधन कोणत्या सामाजिक समस्याविषयी संबंधित असेल, तर त्याचा उपयोग सामाजिक समस्याची सोडवणूक करण्यासाठी उपयुक्त व मार्गदर्शक ठरत असतात.

४. अहवालातील माहितीचे प्रामाण्य पारखणे

अहवालातील जी माहिती किंवा निष्कर्ष उपलब्ध होतात. त्यांचे प्रामाण्य तपासता येते. त्यावर चर्चा व परिसंवाद घेता येते. या पूर्नपरीक्षेमुळे अहवाल कसोटीवर तपासला जातो.

संशोधन अहवालाचे घटक (Content of the Report)

संशोधन अहवालावरुन संशोधन संबंधीची संपूर्ण माहिती प्राप्त होते. संशोधन अहवालात पुढील गोष्टीचा समावेश असतो.

1- प्रस्तावना (Introduction)

संशोधन अहवालात सर्वप्रथम संशोधनाची प्रस्तावना लिहिली जाते. प्रस्तावनेमध्ये संशोधनाचा विषय कसा सूचला, त्याचे महत्व आणि संघटन इत्यादीबाबत थोडक्यात माहिती दिली जाते. संशोधन

कार्य करणाऱ्या शासकीय आणि अशासकीय संस्थाचा परिचय, संशोधन कार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संघटनेचा परिचय, कार्यकर्त्यांची निवड आणि प्रशिक्षण, निरीक्षण, तथ्यांची शुद्धता प्रामाणिकता आणि विश्वसनीयतेचे आधार इत्यादी बाबींचा देखील प्रस्तावनेत उल्लेख असतो. संशोधनासाठी लागणारा कालावधी व खर्चाबाबत अगदी संक्षिप्त माहिती दिली जाते. संशोधन करताना निर्माण झालेल्या समस्यांचा उल्लेख केला जातो.

2- समस्यांचे किंवा विषयाचे वर्णन (Description of the Problem)

प्रस्तावनेनंतर संशोधन विषयांची माहिती सादर केली जाते. विषयाची पार्श्वभूमी आणि त्या संबंधात संशोधन करण्याची आवश्यकता कोणती **?** त्यासंबंधी वर्णन केले जाते. संशोधन समस्या किंवा विषयाची निवड का केली**?** तिचे आधार, समस्येच्या अभ्यासापासून होणारे लाभ, ह्यापूर्वी त्या विषयावर झालेल्या संशोधनाचा संक्षिप्त परिचय, पूर्वीच्या संशोधनाशी समस्या विषयाचा संबंध इत्यादी उल्लेख करावा.

3- संशोधनाचा उद्देश (Purpose of Research)

संशोधनाचा उद्देश नवीन ज्ञानाची प्राप्ती करणे, व त्यामध्ये वृध्दी करणे तसेच विद्यमान सिद्धांताची परीक्षा करणे किंवा व्यावहारिक लाभ मिळविणे हा आहे. संशोधनाचा उद्देश कोणता आहे. हे स्पष्ट करणे आवश्यक असते.

4- संशोधनाचे क्षेत्र (Scope or Area of Research)

संशोधनाचे क्षेत्र कोणते आहे. या विषयीची माहिती अहवालात नमूद केली जाते. संशोधनाचे क्षेत्र हे भौगोलिक प्रदेश, सामाजिक वर्ग किंवा निश्चित समुदाय असू शकते. त्या समुदाय किंवा वर्गाच्या जीवनातील कोणत्या पैलू किंवा समस्याचे अध्ययन करण्यात आले आहे या संबंधीची माहिती दिली जाते. त्याचप्रमाणे त्या समुदाय किंवा वर्गाच्या सामाजिक, लोकसंख्यात्मक आणि आर्थिक वैशिष्टयांचे स्पष्टीकरण करुन संशोधन क्षेत्राची निश्चिती बाबतची माहिती प्रस्तुत केली जाते. उदा: भौगोलिक क्षेत्रामध्ये नांदेड जिल्हयाचा समावेश असू शकतो.

5- तथ्य संकलनाच्या पद्धती (Methods of Data Collection)

संशोधन आवश्यक असलेल्या तथ्यांचे संकलन केले जाते. तथ्य संकलनाचे प्रामुख्याने प्राथमिक आणि द्वितीयक हे दोन स्त्रोत आहेत. तसेच निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची, व्यष्टि अध्ययन इत्यादी पद्धतीपैकी कोणती पध्दत निवडण्यात आली व का निवडण्यात आली हे संशोधन अहवालात स्पष्ट करावे लागते. अनुसूची पध्दतीचा संशोधकाने जर वापर केला असेल तर तो प्रत्यक्ष जाऊन अनुसूची भरुन घेत असतो. तसेच व्यष्टि अध्ययन पध्दतीचा संशोधक वापर करत असले तर विशिष्ट भागाचा विशेष अभ्यास केला जात असतो.

उदा: हागंणदरीमुक्त सावरगावचा विशेष अभ्यास, राळेगणसिध्दी येथील पाणी व्यवस्थापनाचा एक व्यष्टी अध्ययन. असा अभ्यास केला जात असतो.

6- नमुना निवड पध्दत (Method of Sampling)

प्रत्येक संशोधनात जनगणना पध्दतीने तथ्य संकलन करणे शक्य नसते. त्याकरिता नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला जातो. प्रस्तुत संशोधनात कोणत्या प्रकारच्या नमुना पध्दतीचा उपयोग करण्यात आला. ती नमुना निवड पध्दती प्रस्तुत संशोधनाकरिता कशी उपयुक्त आहे त्याचे स्पष्टीकरण संशोधन अहवालात दिले जाते.

उदा: १) स्तरीय नमुना पध्दतीनुसार उपयोग करतांना संग्रहित केलेली माहिती तिच्यातील एकजिनसी गुणानुसार विभागली जाते व त्यातून नमुने निवडले जातात. समजा नांदेड शहरातील लोकांच्या

उपभोगाचा अभ्यास करतांना शहराची विविध विभागात विभागणी केली जाईल व त्या प्रत्येक वार्डातून नमुन्यांची निवड स्वैरपद्धतीने केली जाते.
उदा: २) सोयीची नमुना पध्दती ही सर्वेक्षकाच्या सोयीवर अवलंबून असते. उदा: रेशनकार्डधारक किंवा वीजबिल धारकांच्या यादीतून नमुने निवडणे व आपल्या सोयीचे निवडणे याला सोयीची नमुना पद्धती म्हणतात.

७. संशोधन कार्याचे संघटन (Organization of Research Work)

संशोधन कार्याचे संघटन प्राथमिक सामुग्री कोणी व कशी जमा केली, सामग्रीचे संकलन, संपादन, सारणीयन, शुध्दता, सामग्रीचे प्रामाण्य, परीक्षण कसे केले इत्यादींचा उल्लेख.

8- विश्लेषण आणि निर्वचन (Analysis and Interpretation)

संशोधनात तथ्यांचे संकलन केल्यानंतर त्या तथ्यांना व्यवस्थित लावावे लागते. त्याकरिता तथ्यांचे वर्गीकरण, संकेतीकरण, सारणीकरण करुन विश्लेषण केले जाते. उदा: ५.५ या सारणीत काही दारिद्रयाविषयी आकडेवारी दिलेली असेल तर त्याचे विश्लेषण केले जाते. तथ्यांच्या विश्लेषणात त्यांचे कार्यकारण संबंध स्पष्ट केले जाते. संशोधनाच्या वर्णनात्मक निर्वचनात त्यांच्या निष्कर्षांना प्रस्तुत केले जाते. तसेच निष्कर्षांच्या आधारे स्पष्टीकरण करुन विश्लेषण करतांना तथ्यांचे सांख्यिकीय विश्लेषण करुन आकृत्या काढल्या जातात. उदा: ३.५ या आकृतीत शौचालयाचा वापर करणाऱ्या कुटुंबाची संख्या दर्शविली आहे असे दिले जाते. त्यामुळे संशोधन अहवाल अधिक आकर्षक होतो. व त्या संबंधीचे संदर्भ दिले जातात.

9- सूचना व उपाययोजना (Suggestion)

निष्कर्ष दिल्यानंतर संशोधनोत्तर सूचना द्यावी हया सूचना उपयोगी व व्यावहारिक दृष्टीने फायदयाच्या असाव्या, समस्या सोडविण्यासाठी शासन संस्थेने, सामाजिक नेत्याने किंवा उदयोगपतीनी काय काय करावे हे सुचविले पाहिजे. हया सूचना फार महत्त्वाच्या असतात. कारण त्यांच्यामागे ज्ञान, अनुभव व दूरदृष्टी असते.

10- संलग्नपत्रे किंवा परिशिष्टे (Appendices)

संशोधन अहवालात सूचना आणि उपाययोजना दिल्यानंतर अहवाल पूर्ण होतो. पण संशोधनाच्या शेवटी संशोधनासंबंधी परिशिष्ट जोडणे आवश्यक असते. संशोधनाची प्रामाणिकता सिध्द करण्यासाठी शेवटी काही महत्त्वाची दस्तऐवज, कागदपत्रे, चार्ट, आलेख, सूत्रे, छायाचित्रे, संदर्भ ग्रंथसूची इत्यादीचा परिशिष्टात समावेश केला जातो.

अहवालाचे महत्त्व (Importance of Report)

अहवाल म्हणजे संशोधन कार्याचे संक्षिप्त विवरण. हे विवरण शासन संस्था सामाजिक संस्था, औद्योगिक प्रतिष्ठाने व संशोधक अभ्यासक ह्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे व उपयुक्त असते. संशोधन अहवालाचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहेत.

१) **ज्ञानाचा प्रसार करण्यात मदत :** संशोधन अहवालामुळे वेगवेगळया संशोधनासंबंधीची माहिती वाचकांना प्राप्त होते. अहवालात संशोधन विषयाबरोबरच इतर संबंधित गोष्टींची माहिती असते. म्हणून संशोधन अहवालामुळे ज्ञानाचा प्रसार करण्यात मदत होते.

२) **नवीन अध्ययनाकरिता गृहितकृत्याचा आधार :** संशोधन अहवाल वाचल्यानंतर अनेक नवनवीन कल्पना सूचतात. त्या संशोधनाच्या आधारावर नवीन गृहितकृत्याची निर्मिती करणे शक्य होते. त्याचबरोबरच नवीन समस्या सूचतात त्यातून नवे संशोधन कार्य उभे होते.

३) संशोधन पध्दती व तंत्राचे ज्ञान

संशोधन अहवालामध्ये कोणत्या संशोधन पध्दती आणि तंत्राचा उपयोग केला, याची माहिती दिली जाते. त्यामुळे वाचकांना संशोधन पध्दती व तंत्राचे ज्ञान मिळते. नवीन संशोधकांना आपल्या संशोधन कार्याकरिता संशोधन पध्दती आणि तंत्राची निवड करण्यास मदत होते.

४) सामाजिक योजना व सामाजिक विकासासाठी मदत

संशोधन अहवालामुळे अनेक सामाजिक विषय, समस्या इत्यादीचे ज्ञान प्राप्त होते.

५) सामान्य लोकांना उपयुक्त

संशोधन अहवाल सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने देखील उपयुक्त असतो. सामाजिक संशोधन हे समाजाशी निगडीत असते. अहवालामध्ये सामाजिक विषयाच्या संबंधात अनेक महत्त्वाच्या सूचना आणि उपाय दिलेले असतात. या सूचना किंवा उपायांचा उपयोग शासन सामाजिक संस्था इत्यादींना होतो.

समारोप

आशा प्रकारे, सामाजिक संशोधनात वैज्ञानिक पध्दतीचा व तंत्राचा उपयोग करुन तथ्यांचे संकलन केले जाते. संशोधन अहवालाद्वारे लिखित स्वरुपात संशोधन प्रस्तुत मांडले जाते. त्यामुळे संशोधन अहवालाचे विशेष महत्त्व आहे. संशोधन कर्त्याने केलेले संशोधन हे केवळ संशोधकापूरतेच मर्यादित राहत नाही. अहवालामुळे संशोधनाची माहिती सर्व लोकांना प्राप्त होते. यामध्ये संशोधन पध्दती, तंत्रे, संशोधनाचे क्षेत्र, नमुना इत्यादी बाबत स्पष्ट व विस्तृत विवरण केले जाते. त्यामुळे वाचकांना संशोधनासंबंधीची पूर्ण कल्पना येते. त्यामुळे त्या संशोधनावर लोक चर्चा करतात. अनेकदा टिका देखील केली जाते, काही संशोधक प्रस्तूत संशोधन तपासून बघतात. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाची वृध्दी होण्यास मदत होते. तसेच त्यांचा व्यावहारिक फायदा देखील होत असतो. संशोधन अहवालातून सामाजिक गोष्टीच्या संबंधात अनेक व्यावहारिक गोष्टी ज्ञात होतात. संशोधकाची क्षमता, प्राप्त परिस्थिती आणि वेळ व आर्थिक तरतूद तसेच संशोधकाने घेतलेले परिश्रम हे सर्व कार्य सामाजिक संशोधनासाठी उपयुक्त ठरत असते.

संदर्भ

१) आगलावे प्रदीप, 'संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर (२०००), पृ.क्र.४७७ ते ४८५

२) घाटोळे रा.ना., 'समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे आणि पध्दती', मंगेश प्रकाशन, नागपूर (१९९०), पृ.क्र.२५६ ते २६५

३) देशमुख राम, 'मुलभूत सांख्यिकी', विद्या प्रकाशन, नागपूर (२००५), पृ.क्र. ३५ ते ३८

४) कुमार रणजित, 'संशोधन पद्धती', सेज पब्लिकेशन, दिल्ली (२०१४), पृ.क्र. ३९६

५) संशोधन आराखडा, योजना मासिक, नोव्हे.२००९ पृ.क्र. ३५ ते ३९

६) G. Vijayalakshmi & C. Sivapragasam, Research Methods, MJP Publisher, Delhi, P.No. 169 to 170

७) Kothari C R, Research Methodology, Wishwa Prakashan, New Delhi, (2004)